# सायबर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण

**चव्हाणनगर, पाषाण रोड, पुणे ४११००८**

**ई-मेल :** cybercell.pnr@mahapolice.gov.in

**संकेतस्थळ :** www.puneruralpolice.gov.in, **दुरध्वनी क्र.** ०२०-२५६५५४६१६


दि. २३/०८/२०२४

## नागरिकांना आवाहन

## WhatsApp हॅक/ अनाधिकृतपणे ताबा घेतलेबाबत...

WhatsApp हा आपल्या दैनंदिन संप्रेषणाचा अविभाज्य भाग बनला आहे, ज्यामुळे त्याची सुरक्षितता सुनिश्चित करणे महत्त्वाचे आहे. सध्या फसवणूक करणारे इसम नागरिकांना त्यांचे मोबाईलवर WhatsApp द्वारे ऑफर/ विविध प्रक्षोभक जाहिराती बाबत लिंक पाठवत असल्याचे निदर्शनास आले आहे, जेणेकरून नागरिकांनी त्या लिंकवर क्लिक केल्यास त्यांचे मोबाईल मधील WhatsApp चा एक्सेस हा फसवणूक करणारा इसम घेत आहे. आणि त्या WhatsApp द्वारे आपले नातेवाईक, मित्र परिवार यांना पैशाची मागणी करत आहेत. तसेच आपल्या WhatsApp मधील संपर्क क्रमांक, वयक्तिक गृप ई. माहिती त्यांच्यापर्यंत जात असल्यास अशा वेळी आपण काय केले पाहिजे त्यासाठी खालील प्रमाणे काळजी घ्यावी.

### WhatsApp खात्याचा ताबा अन्य व्यक्तीकडे गेला असेल तर काय करावे ?

- आपले WhatsApp अन्य व्यक्तीच्या ताब्यात असले तर त्याच्या कडील एक्सेस काढणे करिता प्रथम आपल्या मोबाईल मधील WhatsApp ॲप्लीकेशन डिलीट करून पुन्हा नव्याने डाउनलोड करून घ्यावे.
- WhatsApp ओपन करा आपला हॅक झालेला मोबाईल क्रमांक नमूद करा आपले मोबाईल नंबरवर SMS द्वारे सहा-अंकी सत्यापन कोड आला असले तो नमूद करा.

( या प्रक्रियेमुळे पुढील व्यक्तीकडे असलेला WhatsApp चा एक्सेस आपोआप निघून जाईल व WhatsApp लॉग आउट होईल आणि तो इतरांना एस.एम.एस. करू शकणार नाही. तुमचे खाते सुरक्षित होईल. )

### WhatsApp सपोर्ट येथे रिपोर्ट कसा करावा ?

ज्या मोबाईल मध्ये आपण आपले WhatsApp खाते वापरत होता त्या मोबाईलवर *#06# असा नंबर दाबुन त्याचे IMEI क्रमांक मिळवा.

- त्यानंतर ( https://www.whatsapp.com/contact/?subject=messenger ) या लिंकवर जावून दिलेल्या प्रश्नावलीत माहिती भरा.
- Please enter your message below या रकान्यात खालील प्रमाणे विनंती करून फोर्म सबमिट करा.

> Dear Sir/Madam,
> I have been using the WhatsApp Messenger service with the number +91XXXXXXXX for over two years on the device with IMEI/Device ID [ENTER IMEI NO 1] and [ENTER IMEI NO 2]. However, since this morning, August 01, 2024, I have been unable to log into my WhatsApp account.
>
> I kindly request that you log me out of all other devices except for the ones mentioned above and restore my access to WhatsApp services.
>
> Thank you for your prompt attention to this matter.
> Best regards,
> [Your Name]

## ❑ WhatsApp खाते पुन्हा कसे मिळवावे ?

WhatsApp यांचे अधिकृत ईमेल आयडी support@whatsapp.com यावर खालील नमुना प्रमाणे ईमेल तयार करून तो ईमेल पाठवा जेणे करून आपले WhatsApp खात्याचा एक्सेस आपणास परत मिळण्यास मदत होईल.

Dear Sir/Madam,

I have been using WhatsApp Messenger with the number +91XXXXXXXX for over two years on the device with IMEI/Device ID [ENTER IMEI NO 1] and [ENTER IMEI NO 2]. However, since the morning of August 11, 2024, I have been unable to log into my WhatsApp account. It appears that my account was hacked, and the two-step verification PIN and recovery email address have been changed.

I kindly request your assistance in recovering my WhatsApp account. Please help me to regain access by providing the two-step verification PIN or by assisting with the recovery process. Additionally, I request that you log me out of all other devices except for the ones mentioned above.

Thank you for your prompt attention to this matter.

Best regards,
[Your Name]

**टिप :** आपणास WhatsApp सपोर्ट यांचे अधिकृत ईमेलवरून जी माहिती विचारली जाईल त्याबाबत व्यवस्तीतरित्या त्यांना ईमेल करावा.

## ❑ आपले WhatsApp खाते सुरक्षीत कसे करावे ?

- **टू-स्टेप व्हेरिफिकेशन :**

टू-स्टेप व्हेरिफिकेशन हा आपले WhatsApp सुरक्षित करण्यासाठी योग्य पर्याय आहे. टू-स्टेप व्हेरिफिकेशन चालू केल्याने खाते हॅक/ दुसरा इसम आपले खाते लॉगीन करण्याचा प्रयत्न करत आल्यास तो तुमचे खाते लॉगीन करण्यास अयशस्वी होवू शकतो.

- **टू-स्टेप व्हेरिफिकेशन चालू कसे करावे ?**

✓ WhatsApp "Settings" उघडा.
✓ Account > Two&Step Verification > Turn On किंवा PIN Set वर क्लिक करा.
✓ तुम्हाला हवा तो ६ अंकी पिन एंटर करा आणि तो कन्फर्म करा.
✓ तुमच्याकडे ॲक्सेस आहे असा ईमेल ॲड्रेस नमूद करा.
✓ "Next" वर क्लिक करा.
✓ तुम्ही नमूद केलेल्या ईमेल ॲड्रेसवर आलेला ६ अंकी कोड नमूद करा अणि "Verify" वर क्लिक करा.

तुमचे टू-स्टेप व्हेरिफिकेशन यशस्वीपणे चालू झाले आहे.

**टिप : तुम्ही नमूद केलेला ६ अंकी टू-स्टेप व्हेरिफिकेशन हा गोपनीय असल्याने तो कोणालाही सांगू नका.**

**( उमेश तावसकर )**
**पोलीस निरीक्षक,**
**सायबर पोलीस स्टेषन, पुणे ग्रामीण.**